नि. फौ. ख. क्र. २३१/२०२१ निशाणी १४

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – रघुनाथ विठ्ठलराव नेमाडे

वय – ३९ वर्षे, व्यवसाय – पो.हवा. पोलीस स्टेशन उरळ

पत्ता – खडकी, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दि. ११.०७.२०२१ रोजी मी पोलीस स्टेशन उरळ येथे पो. कॉ. म्हणुन कार्यरत होतो. तेथे कार्यरत असतांना पो.हवा. विजयसिंग झाकर्डे, ब.नं. १६०९ यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, हातरुन येथील एक इसम गोवंश मास बोरगांव वैराळे रस्त्याने घेवुन जात आहे. त्यावेळी मी आणि श्री. झाकर्डे पेट्रोलिंग डयुटी करीत होतो. माहिती मिळाल्यानंतर आम्ही बोरगांव वैराळे रस्त्यावरील दुधाळा फाटया जवळ नाकाबंदी केली. त्या ठिकाणी आम्ही दोन पंचांना बोलवुन घेतले आणि काही वेळाने एक इसम काळया रंगाच्या मोटरसायकलवर बोरगांव वैराळे रस्त्याने हातरुन कडुन येतांना दिसला. त्याच्या मोटरसायकलवर एक थैली होती. मोटरसायकलस्वारास थांबवुन विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव शेख बशीर शेख कदीर, रा. हातरुन असे सांगितले. पंचां समक्ष थैलीची पाहणी केली असता त्या थैलीत अंदाजे ४० किलो गोवंश मास अंदाजे रु. ८०००/– किंमतीचे आढळुन आले. त्या ठिकाणी घटनास्थळ पंचनामा करुन जप्त मुद्देमालाचे जप्तीपत्रक तयार केले. घटनास्थळ व जप्ती पंचनामा केल्यानंतर पंचां समक्ष जप्त केलेल्या गोवंश मासातुन काही मास सि.ए. करीता नमुना काढुन घेतला. उर्वरित मुद्देमाल पंचां समक्ष नाश केला. जप्ती पंचनाम्यासोबत मोटरसायकल जप्त करण्यात आली होती. त्याचा क्रमांक एम.एच. ३० बी.ई ९६८९ असुन ती युनिकॉर्न कंपनीची होती. सदर पंचनामे श्री. झाकर्डे यांनी केले आणि मी लेखणीक होतो. सदर घटनेची तक्रार श्री. झाकर्डे यांनी केली. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन.एन.जामोदे यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही पोलीस कर्मचारी कर्तव्यावर असतांना किंवा गस्तीवर असतांना कोणत्या भागात कर्तव्यावर किंवा गस्तीवर आहे त्याची नोंद स्टेशन

डायरीत केलेली असते. कोणतीही गुप्त माहिती मिळाल्यावर त्याची वरिष्ठांना माहिती दयावी लागते. गुप्त माहितीची नोंद स्टेशन डायरीत करावी लागते व ती लिखित स्वरुपात असते. जो पर्यंत मासची तपासणी होत नाही तोपर्यंत ते मास कोणत्या जनावराचे आहे ते सांगता येत नाही. श्री. झाकर्डे यांनी श्री. बिल्लेवार आणि श्री. प्रमोद चितोडे यांना पंच म्हणुन बोलविले होते. पंचांना फोनद्वारे हजर राहण्याची माहिती दिली होती.

प्रश्न – उर्वरित मुद्देमालाचा नाश केल्याबद्दल पंचनामा करावा लागतो ?

उत्तर – मुद्देमाल नाश केला परंतु त्याचा पंचनामा केला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला मुद्देमाल मिळाला नाही म्हणुन आम्ही त्याचा नाश केल्याचा पंचनामा केला नाही. मला माहित नाही की, मुद्देमाल नाश करणेबाबत संबंधीत न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सि.ए. करीता जप्त केलेल्या नमुन्याचे मोजमाप केले जाते व ते दोषारोपपत्रासोबत जोडले जाते. कोणताही सि.ए.करीता काढलेला मुद्देमाल नाशवंत असुन तो जास्त काळ टिकत नाही. सदर नमुना लगेच तपासणीकरीता पाठवावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की, थैलीमधुन ४० किलो मास आढळुन आल्याबद्दल मला काही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक ११.०७.२०२१ रोजी पोलीस स्टेशन उरळ येथे कार्यरत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री. झाकर्डे यांच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझे बयान नोंदविण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखत असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.05.31 13:54:46 +0530

बाळापूर.
दि. २८/०५/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.